Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – X Issue – I January – February 2021

# व्यावसायिक शिक्षणामध्ये मुख्याध्यापक व शिक्षकांच्या भुमिकेचा अभ्यास

**संशोधिका**
**श्रीमती सिंधू विश्वंभर झोडपे**
विद्यार्थीनी पीएच.डी. (शिक्षणशास्त्र) प्रवेशित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**सारांश :**

शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर अकरावी, बारावीत प्रवेश घेण्यासाठी आपण भावी काळात कोणत्या व्यवसायात प्रवेश करणार आहोत याचा निर्णय सर्वच विद्यार्थ्यांना करावा लागतो. त्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन ही अत्यंत महत्त्वपूर्ण प्रक्रिया ठरते. शालेय शिक्षण घेत असतांनाच शाळेतच व्यवसाय मार्गदर्शन होणे खूप गरजेचे आहे आणि म्हणूनच व्यवसाय मार्गदर्शन प्रक्रियेत मुख्याध्यापक, शिक्षक व पालक हे तीन घटक अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. शाळेतील मुख्याध्यापकाचे स्थान, अधिकार व दर्जा अद्वितीय असतो. व्यवसाय मार्गदर्शनाचा कार्यक्रम शालेय स्तरावर परिणामकारकपणे कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने मुख्याध्यापकाचा सहभाग खूपच महत्त्वाचा ठरतो. वर्गात शिक्षकाचे स्थान हे सर्वार्थाने असामान्य असते. शिक्षक मार्गदर्शनाचा मुख्य आधार असतो. शिक्षक व मार्गदर्शिताचे संबंध आधिच प्रस्थापित झालेले असतात. त्यामुळे व्यवसाय व मार्गदर्शनाचे कार्य अधिक सुगमरित्या पार पाडण्यात मदत मिळते. पालकांनी आपल्या आशा-आकांशा आपल्या पाल्यावर जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न करता कामा नये. आपल्या पाल्याची विविध विषयातील प्रगती, आवड याबाबत अनौपचारिक चर्चा करुन मार्गदर्शन प्रक्रियेत हातभार लावावा. एकूणच विद्यार्थ्यांना योग्यरित्या व्यवसाय मार्गदर्शन करुन त्यांच्यात योग्य व्यवसाय निवडीची क्षमता निर्माण करण्यात मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांची भूमिका खूप महत्त्वाची आहे.

*Golbal Oline Electronic International Reserch Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

ग्रामीण असो वा शहरी दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शनाची नितांत गरज आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी उद्दिष्ट ठरविले पाहिजे. उद्दिष्टपूर्ततेसाठी मार्गदर्शनाची आवश्यकता असते. इयत्ता १०वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला विशिष्ट विद्याशाखेची निवड करावी लागते आणि त्या विद्याशाखेनुसारच त्याचे भावी जीवनातील व्यावसायिक भवितव्य ठरत असते. वेगवेगळया व्यवसायांसाठी वेगवेगळी कौशल्ये, विशिष्ठ ज्ञान, अभिवृत्ती, अभिरुची असलेल्या व्यक्तींची गरज असते. स्वत:मधील गुण व मर्यादा यांची जाणिव विशिष्ठ व्यवसाय शिक्षण घेण्यापुर्वी व्यवसाय मार्गदर्शनाने प्राप्त होते आणि व्यवसाय निवडीस मदत मिळते.

कोणत्याही शालेय कार्यक्रमाची यशस्विता ही मुख्याध्यापकाच्या अभिरुची, अभिवृत्ती, उत्साह, त्याचे व्यक्तिमत्त्व आणि त्याचा सहकाऱ्यांवरील प्रभाव या गोष्टीवर प्रामुख्याने अवलंबून असते. मुख्याध्यापक हा समंजस, मर्मदृष्टीयुक्त आणि बदललेल्या परिस्थितीत मार्गदर्शनाच्या कामाचे महत्त्व त्याला पटलेले असले पाहिजे. विद्यार्थ्याला स्वत:ची क्षमता आणि शैक्षणिक व व्यावसायिक संधी यांची सुयोग्य सांगड घालण्यास सक्षम बनविणे हा व्यवसाय मार्गदशनाचा महत्त्वाचा भाग आहे हे काम योग्य रितीने होत आहे किंवा नाही यावर मुख्याध्यापकांनी लक्ष केंद्रित करण्याबरोबरच खालील बाबी मुख्याध्यापकांकडून अपेक्षित आहेत.

१. व्यवसाय मार्गदर्शनाचे काम संघटितपणे कसे होईल हे पाहणे.
२. व्यवसाय मार्गदर्शनाचे काम परिणामकारकरित्या करण्याच्या दृष्टिने शाळेत सर्व साहित्य व सुविधा उपलब्ध करुन देणे.
३. समुपदेशनाच्या व व्यवसाय कार्यास वेळ व तासिका उपलब्ध करुन देणे.
४. व्यवसाय विज्ञाच्या कामाचे पर्यवेक्षण व आढावा घेणे.
५. चांगल्या प्रकारची मार्गदर्शन सेवा देण्याच्या दृष्टीने विधायक नेतृत्व देणे.
६. शाळेतील सर्व सहकारी शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या समस्या, गरजा, गुणवैशिष्ट्ये समजावून घेण्यास उद्युक्त करणे.

७. शिक्षक समुपदेशक यांना अधिक कौशल्यपूर्ण मार्गदर्शनात मदत करण्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे.

८. इयत्ता १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन परिषदांचे आयोजन करणे.

९. पालकांशी वेळोवेळी संपर्क साधून विद्यार्थ्यांविषयी माहिती त्यांना द्यावी.

१०. व्यवसाय मार्गदर्शन हे समाजोपयुक्त व पोषक अशी चळवळ असल्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थी लाभ घेतील अशी सुविधा पुरवावी.

११. कार्यक्षम शिक्षक समुपेदशकांना शालेय शिक्षण प्रवाहात समाविष्ठ करुन घेणे.

१२. परिसरातील शाळांमधील विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शनाची माहिती सहज उपलब्ध होईल असे पाहणे.

१३. पालक-शिक्षक संघटनेच्या माध्यमातून प्रगतीशील विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करणे.

१४. मुख्याध्यापक हा समाजपरिवर्तनाचा एक महत्त्वाचा घटक आहे. परिसरातील माजी विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शनाच्या संधी उपलब्ध करुन देणे.

१५. माजी विद्यार्थ्यांतील यशस्वी उद्योजक, व्यावसायिक, विचारवंत, गुणवंत विद्यार्थ्यांचे सध्या शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बोलावणे.

१६. व्यवसाय मार्गदर्शन मंडळाची स्थापना करणे व विविध उपक्रम योजने. उदा. व्यवसायिक स्थळांना भेटी देणे, जाहिरातीचे संकलन व वितरण करणे. व्याख्यान, परिषदा योजने, व्यवसाय मार्गदर्शन दिन साजरा करणे.

१७. शाळेत व्यवसाय विज्ञ शिक्षक उपलब्ध करणे व व्यवसाय मार्गदर्शन पदविका अभ्यासक्रम पाठवणे.

**शिक्षकांची भुमिका :**

शाळेत ज्या प्रमाणे मुख्याध्यापकाचे स्थान अद्वितीय आहे त्याच प्रमाणे वर्गात शिक्षकाचे स्थान हे असामान्य असते. मुख्याध्यापक हे आदरास प्राप्त असतात, तर शिक्षक विद्यार्थ्यावर प्रेम करतो. त्याचे व विद्यार्थ्यांचे संबंध जिव्हाळयाचे असतात. शिक्षक मार्गदर्शनाचा मुख्य आधार असतो. अध्यापन आणि मार्गदर्शन या दोन्ही कार्यातील अनुभवांमुळे त्यांचे मार्गदर्शन अधिक परिणामकारक बनते. त्याचे व मार्गदर्शिताचे संबंध आधीच प्रस्थापित झालेले असतात. त्याने मार्गदर्शिताचा विश्वास संपादन केलेला असतो त्यामुळे मार्गदर्शकाचे कार्य अधिक सुगम बनते. म्हणून शिक्षक पुढील बाबींच्या दृष्टीकोणातून व्यवसाय मार्गदर्शनात महत्त्वाची भूमिका बजावतो.

१. शिक्षकास बालमानसशास्त्र, समाजशास्त्र, आर्थिक व्यवहार वगैरेचे चांगले ज्ञान हवे.

२. शिक्षक आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांचे निरिक्षण करतो त्यामुळे विशिष्ट व्यवसायासाठी लागणारी गुणवैशिष्ट्ये कोणत्या विद्यार्थ्यांत आहेत याचा त्याला अंदाज आलेला असतो.

३. विद्यार्थ्यांची अभिरुची, अभिक्षमता ओळखून त्यास व्यवसाय मार्गदर्शन करणे.

४. पालक व विद्यार्थी यांना व्यवसाय मार्गदर्शनाचा दृष्टिकोण विशद करुन सांगणे व त्यांचे सहकार्य मिळविणे.

५. विविध व्यावसायविषयक माहिती गोळा करुन ती विद्यार्थ्यांपर्यत पोहचविणे.

६. समुह वार्ता, व्यवसाय वार्ता, वार्ता फलकावर योग्य माहितीचे प्रदर्शन करणे तसेच माहिती पट दाखविणे.

७. प्रत्येक विद्यार्थ्यांची संकलित नोंदपत्रिका ठेवण्याची व्यवस्था करणे.

८. विद्यार्थ्यांना मानसशास्त्रीय कसोट्या देणे व त्यांचा अन्वयार्थ लावणे.

९. पालक सभांमध्ये विद्यार्थ्यांच्या भावी शाखा निवडी संबंधी किंवा भविष्यातील व्यवसाय निवडी संबंधी चर्चा करणे.

१०. पालकांमध्ये व्यवसाय मार्गदर्शनासंबंधी जागरुकता निर्माण करणे.

११. पालकांशी वेळोवेळी संपर्क साधावा व विद्यार्थ्यांच्या अभिरुची, गरजा व योग्यता यांची माहिती पालकांना द्यावी.

१२. व्यवसाय मार्गदर्शन प्रक्रियेतील पालकाची भूमिका किती व कशी महत्त्वाची आहे हे त्यांना पटवून देण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षक करु शकतो.

१३. प्रत्येक विद्यार्थी हा वेगळा असतो व प्रत्येकाच्या अंगी काही गुण-विशेष असतात ते ओळखून विद्यार्थ्यांना त्या गुणवैशिष्ट्यात निपूणता आणण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

१४. शाळेत व्यवसायविज्ञ म्हणजेच व्यवसाय मार्गदर्शनाचे प्रशिक्षण घेतलेले शिक्षक उपलब्ध नसल्यास शिक्षकानेच व्यवसाय मार्गदर्शनाचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडावे.

१५. अध्यापन करत असतानांच विविध विषयांशी संबंधित भावी आयुष्यातील संधीची ओळख शिक्षकाने वेळोवेळी विद्यार्थ्यांना करुन द्यावी.

१६. विज्ञान व गणित बाबतच्या विविध शिष्यवृत्या व स्पर्धा परिक्षांची माहिती देत असतानांच 'ऑलंपियाड', होमी भाभा केंद्र, टाटा मुलभूत संशोधन केंद्र यांचा परिचय करुन देणे.

१७. भाषा विषयात रुची असलेल्या विद्यार्थ्यांना ते भावी काळात वकील, नेता, निवेदक, कवि उत्तम लेखक बनू शकतात याची जाणिव करुन देऊन त्यांच्या अंगी असणारे भाषिक गुण जोपासण्यास मार्गदर्शन करणे.

प्रत्येक व्यक्ती हा आपल्या आयुष्याचा खूप मोठा काळ शालेय शिक्षण घेत असतांना व्यतीत करीत असतो आणि या शालेय जीवनातच त्याच्या भावी जीवनातील व्यावसायिक यशस्वीतेची पायाभरणी होत असते. यामुळे व्यवसाय मार्गदर्शन प्रक्रियेतील मुख्याध्यापक, शिक्षक व पालक हे तीनही घटक अनन्यसाधारण भूमिका पार पाडत असतात. 'करिअर'या शब्दाचा अर्थ केवळ पेशा, व्यवसाय किंवा जीविका एवढच नसून जीवनातील प्रगती, जीवनातले यश व जीवनमार्ग हा देखील आहे म्हणूनच जो मार्ग विद्यार्थी आयुष्यभरासाठी निवडणार आहे, ज्या वाटेवर त्याला आयुष्यभर चालायच आहे त्या विषयी पालक, शिक्षक व मुख्याध्यापक यांनी जागरुक राहून योग्य मार्गदर्शन करण्या हेतू सुविधा व संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करु देणे अत्यंत गरजेचे आहे. जेणे करुन शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर विद्यार्थी अचूक क्षेत्र निवडून त्यात यशस्वी होतील व एक उत्तम, प्रगत राष्ट्र घडवतील.

**संदर्भ सूची**

१) पत्की, मा. (१९८४) व्यवसाय मार्गदर्शन आणि सल्ला कार्य. औरंगाबादः मिलिंद प्रकाशन.

२) दुनाखे, अरविंद. (२००५) शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन व समूपदेशन : नित्य नूतन प्रकाशन.